# मुंबई अधिवेशन

मुंबई (प्रतिनिधी) राज्य शासनाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पोषण आहार दिले जात असून अंगणवाडी केंद्रामधील बालकांना आहार पुरविणाऱ्या महिला बचतगटांना वाढीव दर देण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

राज्यातील अंगणवाडी केंद्रामधील बालकांना शासनातर्फे देण्यात येणारा मोफत पोषण आहार (गरम आहार) विविध महिला बचतगटांच्या माध्यमातून दिला जातो. हा पोषण आहार तयार करण्यासाठी संबंधितांना प्रतिविद्यार्थी दहा रूपये खर्च येतो तथापि शासनाकडून गटांना केवळ ०४ रूपये ९२ पैसेच मिळत असल्याने गेल्या आठ वर्षात केवळ एकच रूपयाने वाढ केल्याने राज्यातील तीन लाख महिला बचतगट आर्थिक संकटात सापडल्याचे मार्च २०१४ मध्ये निदर्शनास आले असून अंगणवाडी केंद्रामधील बालकांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या पोषण आहार दरात वाढ करून देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात विचारणा केली होती.

महिला व बालविकास मंत्री वर्षाताई गायकवाड यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले आहे की, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत ३ ते ६ वयोगटातील लाभार्थ्यांना बचत गट- महिला मंडळाच्या मार्फत गरम ताजा आहार पुरविण्यात येतो. त्याकरिता बचत गट-महिला मंडळांना बीपीएल दराने स्वस्त दरात गहु व तांदुळ उपलब्ध करून देण्यात येतो. या योजनेंतर्गत ४.९२ रूपयांमध्ये ५०० उष्मांक व १२ ते १५ ग्रॅम प्रथिने मिळतील, या पध्दतीने पाककृती तयार करण्यात आलेल्या आहेत. तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण, आदिवासी (नवजीवन प्रकल्पांसह) आणि नागरी क्षेत्रातील पुरक पोषण आहार आणि घरपोच आहाराच्या दरात दि. ०१ ऑक्टोंबर २०११ पासून एक रूपयाने वाढ करण्यास दि.२६ सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

## जेएनपीटी बंदराच्या निर्मितीसाठी ३० वर्षापूर्वी गाव विस्थापित केल्याबाबत

मुंबई (प्रतिनिधी) उरण येथील जेएनपीटी प्रकल्पासाठी संपादित जमीन, पुनर्वसन केलेली जागा व शिल्लक जागा इत्यादी अभिलेखाची तपासणी जेएनपीटी, जिल्हाधिकारी, सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून करून नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांनी अंतिम प्रस्ताव तयार करावा, अशा सुचना करण्यात आल्याची माहिती लेखी उत्तराव्दारे पुनर्वसन व मदत कार्य मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी दिली आहे.

जेएनपीटी बंदराच्या निर्मितीसाठी ३० वर्षापूर्वी गाव विस्थापित करताना पुनर्वसन कायदा १९७६ नुसार पुनर्वसन केले नसून त्याऐवजी कमी जागेत पुनर्वसन केल्याने त्याविरोधात गेल्या २५ वर्षापासून ग्रामस्थांचे विविध मागण्यांबाबत अद्याप आंदोलने सुरूच राहिले आहेत. या प्रकरणी जिल्हाधिकारी ते पुनर्वसन मंत्री यांच्याकडे बैठका होऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही न होण्याची काय कारणे आहेत, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात पुनर्वसन व मदत कार्य मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सांगितले की, जेएनपीटी बंदराच्या उभारणीसाठी३० वर्षापूर्वी गाव विस्थापित करताना पुनर्वसन कायदा १९७६ नुसार पुनर्वसन केले नसून त्याऐवजी कमी जागेत पुनर्वसन केल्याने त्याविरोधात गेल्या २५ वर्षा पासून ग्रामस्थांचे विविध मागण्यांबाबत अद्याप आंदोलने सुरूच असल्याची बाब खरी असून जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना हनुमान कोळीवाडा येथे २५६ भूखंड तर नवीन शेवा येथे २३७ भूखंडाचे वाटप केलेले असून जेएनपीटी प्रशासनामार्फत पुनर्वसन गावांना नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांच्या उर्वरित जागेच्या मागणी संदर्भात ९ जून २०१३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.त्यामध्ये प्रकल्पासाठी संपादित जमीन, पुनर्वसन केलेली जागा व शिल्लक जागा इत्यादी अभिलेखाची तपासणी जेएनपीटी, जिल्हाधिकारी, सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून करून नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांनी अंतिम प्रस्ताव तयार करावा, अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

## तंत्रशिक्षण अभ्यासक्रमातील विविध पदांच्या जागा रिक्त असल्याबाबत

मुंबई (प्रतिनिधी) राज्यातील उच्च व शालेय शिक्षण विभागाअंतर्गत तंत्रशिक्षण अभ्यासक्रमातील विविध पदांच्या विभागीय एकूण दोन हजार जागा रिक्त असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

राज्यातील उच्च व शालेय शिक्षण विभागाअंतर्गत तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांतील विविध पदांच्या विभागीय एकूण तब्बल दोन हजार जागा रिक्त असल्याची बाब फेब्रुवारी २०१४ मध्ये माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आली आहे. पदवी अभ्यासक्रमातील शिक्षकांच्या ४७७ तसेच पदविका अभ्यासक्रमातील शिक्षकांच्या १५२९ जागा रिक्त असून या जागा रिक्त राहण्याची काय कारणे आहेत तसेच त्या तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, अशीही विचारणा दाखल केलेल्या तारांकित प्रश्नाव्दारे केली.

उच्च व शालेय शिक्षण विभागाअंतर्गत तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांतील विविध पदांच्या विभागीय एकूण तब्बल दोन हजार जागा रिक्त असल्याची बाब खरी असून अभियांत्रिकी संस्थांमधील अध्यापकांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार अध्यापकांच्या सर्व पदांचे सुधारित सेवा प्रवेश नियम दि.१० सप्टेंबर २०१२ रोजी अधिसूचित करण्यात आले. या सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील ३९९ रिक्त पदांपैकी २४० रिक्त पदांची मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आली असून त्यापैकी महाराष्ट्रात लोकसेवा आयोगाने २२९ पदांची जाहिरात प्रसिध्द केली आहे.उर्वरित १५९ पदांची मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे. पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील अध्यापकांच्या १५२९ रिक्त पदांपैकी १२५३ पदांची मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आली आहेत. त्यापैकी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ९८० पदांची जाहिरात प्रसिध्द केली आहे. उर्वरित ४७६ पदांची मागणीपत्रे आयोगास सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे, असे लेखी उत्तर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी दिले आहे.

## पुणे विद्यापीठाने अचानक शुल्कात वाढ केल्याबाबत

मुंबई (प्रतिनिधी) राज्यातील मास्टर्स इन मार्केटींग मॅनेजमेंट (एमएमएम) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुणे विद्यापीठाने अचानक शुल्कात वाढ केल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

राज्यातील मास्टर्स इन मार्केटींग मॅनेजमेंट शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुणे विद्यापीठाने अचानक शुल्कात वाढ केल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण अर्ध्यावर सोडण्याची वेळ आली असल्याचे मार्च २०१४ मध्ये निदर्शनास आले असून एमएमएमच्या विद्यार्थ्यांचे वाढविण्यात आलेली शुल्क वाढ तातडीने रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, असेही दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात म्हंटले आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले आहे की, राज्यातील मास्टर्स इन मार्केटींग मॅनेजमेंट (एमएमएम) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुणे विद्यापीठाने अचानक शुल्कात वाढ केल्याची बाब खरी असून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमातील तरतूदीनुसार अभ्यासक्रमाचे शुल्क व आकार विहित करण्याचे विद्यापीठास अधिकार आहेत. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे civil wp (st.) No. ८४५७/२०१४ याचिका दाखल झालेली असून सदर प्रकरण प्रलंबित आहे.

## राष्ट्रीय विधी विद्यापीठाची उभारणी व न्यायालयाच्या सुविधांसाठी

मुंबई (प्रतिनिधी) राज्यात मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठाची उभारणी व न्यायालयाच्या सुविधांसाठीच्या खर्चाच्या तरतूद ११० कोटींवरून वाढविण्याच्या निर्णय शासनाने घेतल्याचे जानेवारी २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले असून शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार पुढे कोणती अंलबजावणी करण्यात आली आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई अधिवेशनात दाखल केला होता.

राज्यात मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठाची उभारणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तदवतच विधी व न्याय विभागामार्फत दुय्यम न्यायालयांना पायाभूत सुविधांसाठी केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येते त्या योजनेंतर्गत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील केंद्र शासनाच्या हिश्याचा ११० कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यासाठी केंद्र शासनास विधी व न्याय विभागाने दि.१२ मार्च

२०१४ रोजी पत्राने विनंती केली आहे, असे लेखी उत्तर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी दिले आहे.

## राज्यातील सुशिक्षीत बेरोजगारांच्या प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी

मुंबई (प्रतिनिधी) राज्यातील सुशिक्षीत बेरोजगारांच्या प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या समितीकडून दोन महिन्यात अहवाल मिळणे आवश्यक असताना तीन वर्षे होऊनही अद्यापी अहवाल सादर करण्यात आले नसल्याचे मार्च २०१४ मध्ये निदर्शनास आले असून सदर अहवाल संबंधितांना लवकरात लवकर सादर करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई अधिवेशनात दाखल केला होता.

सुशिक्षीत बेरोजगारांच्या प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या समितीकडून दोन महिन्यात अहवाल मिळणे आवश्यक असताना तीन वर्षे होऊनही अद्यापपर्यंत अहवाल सादर झाला नसल्याची बाब खरी आहे. समितीच्या अद्यापपर्यंत पाच बैठका झाल्या असून इतर देशातील (चीन) व इतर राज्यातील (कर्नाटक, केरळ व गुजरात) बेरोजगारांसाठी राबविण्यात येत असलेले उत्कृष्ट प्रकल्प व योजनांचा अभ्यास दौरा केल्यानंतर समितीचा अहवाल अंतिम होणे अपेक्षित आहे, असे लेखी उत्तर रोजगार व स्वयंरोजगार मंत्री नारायण राणे यांनी दिले आहे.

## ट्रकमध्ये कोंबून भरलेल्या गायी मृत अवस्थेत आढळलेल्याबाबत

मुंबई(प्रतिनिधी) अमरावती जिल्हयातील रावेर येथून १३ कि.मी. अंतरावर असलेल्या आरटीओ चेक पोस्टजवळ ट्रकमध्ये कोंबून भरलेल्या ५५ गायींपैकी २६ गायी मृत अवस्थेत आढळून आल्याचे मार्च २०१४ मध्ये निदर्शनात आले असून याबाबत शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई अधिवेशनात दाखल केला होता.

अमरावती जिल्हयातील वरूड शहरापासून १३ कि.मी.अंतरावर असलेल्या रवाळा आर.टी.ओ.चेकपोस्टजवळ दि.१0 फेब्रुवारी २०१४ रोजी नाकाबंदी करीत असताना एक ट्रक ५३ जनावरांसह ताब्यात घेण्यात आला. ट्रकमधील जनावरांची वैद्यकीय तपासणी करण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आली असता ट्रकमधील सात जनावरे मृत झाल्याचे आढळून आले आहे. या संदर्भात शासनाने चौकशी करून आरोपी ट्रकचालक, ट्रक मालक व इतर अशा तिघांविरूध्द शेंदूरजना घाट पोलीस ठाण्यात अप. क.३00७ / २०१४, प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध कायदा कलम ११ अ, ई , ल, ड, फ, प्राणी संरक्षण कायदा कलम ६, ७, ९, प्राणी संग्रहालय कलम ८ आणि मोटार वाहन कायदा कलम ९१/ १७७ (२) / १७७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

## प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कामातील त्रुटीबाबत

मुंबई(प्रतिनिधी) पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कामातील त्रुटीबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता.

पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्य पार्किंगमध्ये बसून फिटनेस सर्टिफिकेट देणाऱ्या तोतया डॉक्टरने गेल्या आठ वर्षात ३0 ते ४0 हजार फिटनेस दाखले दिले असल्याचे तसेच सदर कार्यालयाकडून देण्यात आलेल्या वाहन परवान्यावर नाव व पत्ता एकचा, तर फोटो व स्वाक्षरी दुसऱ्याची असलेले परवाने वितरीत केल्याचे मार्च २०१४ मध्ये निदर्शनास आले असून या प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात विचारणा केली.

राज्याचे मुंख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले आहे की, पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्य पार्किंगमध्ये बसून फिटनेस सर्टिफिकेट देणाऱ्या तोतया डॉक्टरने गेल्या आठ वर्षात ३0 ते ४0 हजार फिटनेस दाखले दिल्याचे तसेच या कार्यालयाकडून

देण्यात आलेल्या वाहन परवान्यावर नाव व पत्ता एकाचा, तर फोटो व स्वाक्षरी दुसऱ्याची असलेले परवाने वितरीत केल्याची बातमी वृत्तपत्रात छापून आलेली असून या प्रकरणासंदर्भात शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत एक इसम अमरावती येथील एका डॉक्टराचे नाव व रजिस्ट्रेशन नंबर वापरून अनुज्ञप्तीसाठी येणाऱ्या लोकांकडून पैसे घेऊन बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र जारी करीत असल्याचे निदर्शनास आल्याने त्या इसमाविरूध्द पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी तसेच वैद्यकीय अधिकारी, पुणे म.न.पा. यांच्या तक्रारीवरून बंडगार्डन पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून गुन्हा नोंद कमांक ४० / २०१४ कलम ४२०, ४६४, ४६५, ४७०, ४७१ भा.दं.वि. सह बोगस डॉक्टर अधिनियम, १९६१ चे कलम ३३(२) व ३३(अ) अन्वये २२ फेबुवारी २०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपीविरोधात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

शिकावू अनुज्ञप्तीच्या बाबतीत अनुज्ञप्ती कमांकाची संगकणावर नोंद करताना नजर चुकीने कमांकातील एक अंक टाईप करण्याचे राहून गेल्याने अनुज्ञप्तीवर दुसऱ्या व्यक्तीचा फोटो व स्वाक्षरी प्रिंट झाल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकारणी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी संबंधित लिपिकाचा खुलासा मागविला असून या लिपिकास भविष्यात संगणकावर काम करताना दक्षता घेण्याची व अशा चुकीची पुनरावृत्ती न करण्याची समज दिली आहे.

## परिवहन महामंडळाच्या बस स्थानक आणि परिसरात अवैध वाहनांच्या घुसखोरीबाबत

मुंबई(प्रतिनिधी) राज्यात परिवहन महामंडळाच्या बस स्थानक आणि परिसरात अवैध वाहनांची घुसखोरीमुळे त्याचा फटका महामंडळाला बसत आहे. यामुळे दरवर्षी ७५० कोटी रूपयांचे नकुसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अवैध वाहन वाहतूक रोखण्याबाबत एस.टी.च्या दक्षता पथकाकडून कारवाई केली जाते परंतु याकरिता पोलीस तसेच परिवहन विभागाकडून आवश्यक ते सहकार्य मिळत नसल्याने अवैध वाहतुकीला आळा घाळण्याकरिता मर्यादा पडत आहे. या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई अधिवेशनात दाखल केला होता.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले आहे की, राज्य परिवहन मंडळाच्या बसस्थानकात घुसखोरी होत नसून स्थानक परिसरात घुसखोरी होत असल्याचे आढळून आले आहे.त्यामुळे महामंडळाच्या उत्पन्नात घट होत आहे. अवैध वाहन वाहतूक रोखण्यासाठी एस.टी.च्या दक्षता पथकाकडून कारवाई केली जाते. राज्यातील अवैध प्रवासी वाहतूक रोखण्यासाठी पोलीस व परिवहन खाते यांची ३३ पथके महसूल योजनेंतर्गत प्रयत्न करतात त्याचबरोबर पोलीस, परिवहन खाते व महामंडळाचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त पथकाव्दारे अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मेमो-दंडात्मक कारवाई, परवाना जप्त करणे अशा प्रकारची कारवाई केली जाते. ऑक्टोंबर २०१३ ते डिसेंबर २०१३ या कालावधीत ८४७९ वाहनांवर कारवाई करून त्यापैकी १६७ वाहनांचा परवाना रद्द करण्यात आले असून ९०० वाहने पोलीस स्टेशनला जमा करण्यात आली आहे त्याचबरोबर ४३८३ वाहनांवर मेमो बजावण्यात आले व २५६८ वाहनांना ४० लाख ११ हजार ५४५ रूपये दंड करण्यात आला आहे.